महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission
मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२८२१७२८, २२८२११६७
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

**क्रमांक:-११८३/९९९८/नऊ** दिनांक : **२** एप्रिल, **२०१९**

## नगर रचनाकार, गट-अ, (राजपत्रित) नगर विकास विभाग
## (जाहिरात क्रमांक - १७/२०१८)

# घोषणा

महाराष्ट्रलोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या "**नगर रचनाकार, गट-अ, (राजपत्रित) नगर विकास विभागा**" च्या लेखी परीक्षेचा निकाल शासनाच्या दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार दि. १५ऑक्टोबर,२०१८ रोजी जाहिर करण्यात आला आहे. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक संकीर्ण - १११८ / प्र.क्र. ३९/१६ - अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकातील तरतुदीस अनुसरुन ज्या समांतर आरक्षणांतर्गत मागासवर्गीय उमेदवारांनी खुला समांतर आरक्षित पदासाठी निश्चित केलेल्या अर्हतामानाएवढे किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत, परंतु त्यांच्या सामाजिक वर्गवारीतील समांतर आरक्षित पदासाठी निश्चित केलेल्या अर्हतामानापेक्षा कमी गुण प्राप्त केले आहेत, तसेच ज्या वर्गवारीसाठी समांतर आरक्षणाची पदे उपलब्ध नाहीत, तथापि सदर उमेदवार मुलाखतीकरीता अपात्र ठरले आहेत, अशा उमेदवारांचा खुला समांतर आरक्षित पदांवर गुणवत्तेनुसार विचार करुन त्यांना मुलाखतीसाठी बोलविण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. त्यानुसार खुला समांतर आरक्षणाचा सीमांकन रेषेनुसार २६ उमेदवार प्रस्तुत पदाच्या मुलाखतीसाठी पात्र ठरत आहेत. यानुसार पूर्वी घोषित करण्यात आलेल्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या व हया २६ उमेदवारांच्या **मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या लवकरच प्रसिध्द करण्यात येत आहे.**

**२.** प्रस्तुत परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्र तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून चाळणी परीक्षेच्या निकालाआधारे मुलाखतीकरिता प्रवेश देण्यात येत आहे. या तपासणीनुसार अपात्र ठरणा-या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्दयासंदर्भात विविध मा. न्यायालयात/ न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात आला आहे.

सचिव

महाराष्ट्र लोकसेवा आयोग , मुंबई